वनवासी कल्याण आश्रम, आपल्या जनजाती बंधू भगिनींकरिता खालील प्रमाणे काही उपक्रम अगदी एखाद्या पाड्यावर , काही कुटुंबाना, किंवा वैयक्तिक

व्यक्तीस व वसतिगृह चालवून खालील प्रकारे करत असतो...

१) मासे पकडण्याचे तंगुस व 15 X 15 ची जाळी भेट देणे

- चांगल्या प्रतीची दोन्ही मिळून अंदाजे किंमत 1100 रुपये

२) पाड्यावर लहान घरे पावसाळ्यात झाकण्यासाठी स्क्रॅप मधून फ्लेक्स घेऊन ते घरांवर टाकून गळती थांबवणे , अंदाजे सर्वसाधारण आकार 15 X 15 फूट, वाहतूक व सर्व खर्च एक फ्लेक्स साठी 700 रुपये

३) जनजाती बांधवांनी संकलित केलेला शुद्ध मध ( ज्यात साखर, काकवी, गूळ अशी कुठलीही भेसळ नाही) हा विकणे व त्यांना रोजगार मिळवून देणे

४) जनजाती बंधू भगिनींनी बनविलेल्या वस्तू विकणे व त्यांना रोजगार मिळवून देणे उदा:- लाकडी वारली चित्रे

रंगवलेल्या वस्तू, पेंटिंग, राख्या, गणपती फ्रेम, आकाश दिवे, पणत्या इत्यादी. वस्तू किंमत 50 ते 1500/2000, प्रकार व आकार यावर किंमत अवलंबून

५) जनजाती विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह चालवणे, एक विद्यार्थ्यांचा वर्षभराचा सगळा खर्च रुपये 10,000 यात वासतिगृहावर राहणे, जेवण, नाष्टा, वैद्यकीय खर्च, शैक्षणिक व इतर सर्व खर्च येतात

६) जुने वापरण्यायोग्य अथवा पूर्ण नवे कपडे संकलन व पाडे/ वस्त्यांवर वाटप करणे, यात वाहतुकीचा खर्च असतो

७) जुनी वापरण्यायोग्य अथवा पूर्ण नवी भांडी संकलन व पाडे/ वस्त्यांवर वाटप करणे, यात वाहतुकीचा खर्च असतो

८) कल्याण आश्रम चालवत असलेल्या संस्कार वर्गांसाठी खेळणी संकलन करणे व ते संस्कार वर्गावर वितरित करणे, संस्कार वर्गासाठी असलेला खाऊ, म्हणजे शेंगदाण्याचे लाडू ( लहान मुलांना उत्तम पोषण) पुरवणे, हा देखील खर्च तुम्ही देऊ शकता

९) 5 वी ते 10 वी, व संस्कार वर्गासाठी वयानुक्रमे गोष्टीची पुस्तके मिळवणे व वितरित करणे

१०) आरोग्य रक्षक योजनेत, अगदी दूरच्या पाड्यांवर प्राथमिक आजारांवर आराम मिळून, मोठ्या समस्येसाठी रुग्ण तालुक्याच्या ठिकाणी पोचेपर्यंत दिलासा मिळणे हा उद्देश असतो, एका आरोग्य रक्षकाचा खर्च रुपये 5000/-

११) थंडीच्या हंगामाआधी जुनी वापरण्यायोग्य अथवा नवीन चादरी, बेडशीट, घोंगडी जमा करून पाडे आणि

वस्त्यांवर वितरित करणे.

१२) वसतिगृहंसाठी धान्य, मसाले, तेल, कडधान्य मिळवणे व पोचते करणे

१३) जनजाती महिलांना प्रोत्साहन म्हणून रानभाजी

स्पर्धा घेणे, त्यातुन त्या पाड्यावरील निसर्ग सौंदर्य लोकांना

माहीत व्हावे, व नंतर होणाऱ्या पर्यटनातून जनजाती समाजाला नाष्टा जेवण या माध्यमातून रोजगार मिळवून देणे

१४) पाण्याची कमतरता असलेल्या ठिकाणी, बंधारे बांधून पाणी अडवणे, जुन्या विहिरी गाळ काढून स्वच्छ करणे, बांधून देणे, तळी स्वच्छ करून बांधून देणे

१५) जनजाती समाजाच्या मुलांकरिता प्रोत्साहन पर देशव्यापी खेलकुद स्पर्धा घेणे, खेळाकरिता

निवड ते प्रशिक्षण अशी सर्व मदत करणे

१६) 10वी अथवा 12वी नंतर जनजाती विद्यार्थ्यांना, ITI / नर्सिंग प्रशिक्षण/ कौशल्य विकास/ छोटा व्यवसाय या करिता संपूर्ण प्रशिक्षण व त्या करीता लागणारी आर्थिक मदत, कोर्सची फी, हॉस्टेल/ खानावळीचा खर्च देणे

असे अनेक उपक्रम अखंड व पूर्ण देशभर चालू असतात, आपण या बाबतीत वैयक्तिक अथवा CSR माध्यमातून मदत करू शकता.

हा संदेश आपण आपल्या मित्र/ मैत्रिणी व नातेवाईकांना पाठवून कल्याण आश्रमाची माहिती द्यावी ही नम्र विनंती.

तुम्ही केलेल्या आर्थिक मदतीला आपण रीतसर पावती पाठवतो, ज्याला मिळकत करातून सवलत (80G) मिळते.

For online donation

Vanvasi Kalyan Ashram Maharashtra,
Bhor Branch
Bank Of Maharashtra
Account - 020125051829

IFSC Code - MAHB0000247

For more details contact

Sachin Kulkarni - 9921574108

Vanvasi Kalyan Ashram

भारत माता की जय